ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

# ठाकर समाजातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास

*सौ. राजेश्री पाटील आणि प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भामरे,

**प्रस्तावना** :

महिला सबलीकरणाची शासकीय धोरणे अनेक राज्यात राबविली जात आहेत. त्याचा मुख्य उद्देश महिलांचे सबलीकरण करणे हाच आहे. केवळ योजनांद्वारे महिलांचे सबलीकरण होऊ शकत नाही. त्यासाठी महिलांना सबलीकरणाची जाणीव जागृती होणे महत्वाचे असते. सदर संशोधन "ठाकर" या आदिवासी जमातीतील महिलांचे सबलीकरण झाले आहे का ? या संदर्भाने करण्याचा प्रयत्न केला आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तूत संशोधनाची गरज व महत्व :**

"ठाकर" या आदिवासी समाजातील सबलीकरणाच्या अभ्यासातून सदर महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले असल्यास त्यामागील कारणे कोणती ? आणि आर्थिक सबलीकरण झाले नसल्यास त्यामागील कारणे कोणती ? ही माहिती संशोधकाला समजेल.

या माहितीच्या आधारे विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट जमातीतील महिलांना कोणत्या योजना राबवाव्यात याचे मार्गदर्शन करता येईल.

**उद्दिष्टे :**

१) "ठाकर" समाजातील महिलांचे आर्थिक सबलीकरण अभ्यासणे.

२) "ठाकर" समाजातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणा संदर्भात चिकित्सक कारणमीमांसा करणे.

**व्याप्ती व मर्यादा :-** सदर संशोधन हे रायगड जिल्ह्यातील पेण तालुकयातील खौसासी वाडी येथे वास्तव्य करणाया ठाकर या आदिवासी महिलांशी संबंधित आहे.

**संशोधन पध्दती :-** सदर संशोधनासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**नमूना निवड :-** प्रस्तूत संशोधनासाठी खौसाची वाडी येथे वास्तव्य करणाया ठाकर आदिवासी समाजातील ५० महिलांची याइच्छीक पध्दीने निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची साधने :-** संशोधन महिती उपलब्ध करण्याच्या हेतूने सदर संशोधनास प्रश्नावली व प्रासंगिक निरीक्षण आणि अनौपचारीक संवाद ही साधने संशोधन साधने वापरली आहेत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II    MARCH - APRIL 2023

Original Research Article

**संकलित माहितीचे विश्लेषण :-**




घटक

**घटक :**

१) उदनिर्वाहाच्या साधनांची उपलब्धता

२) मोफत आरोग्य व्यवस्था

३) स्वयंसेवी संस्थांची आर्थिक मदत

४) आर्थिक सबलीकरण लघू उद्योगाची उपलब्धता

५) कुडाची झोपडी वास्तव्य

६) शासकीय योजनांचा लाभ

खौसाची वाडी या ठाकर आदिवासी समाजातील महिलांना उदरनिर्वाह करण्यासाठी ५०% महिलांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झाले आहे. महिलांच्या आरोग्याचा विचार करता सदर वाडीतील ९५% महिलांचे आरोग्य चांगले आहे. तर ५% महिला कूपोषित आहेत. सदर वाडीमध्ये “रोटरी क्लब” सारख्या स्वयंसेवी संस्था आर्थिक मदत करत असतात. परंतू आर्थिक मदतीचा लाभ केवळ १०% महिलांना होतो. महिलांना आर्थिक सबल करण्यासाठी लघू उद्योग खौसाची वाडी येथे नाही. शासनाकडून आदिवासींसाठी घरकूल योजना राबविली जात आहे. त्यामुळे ठाकर समाजातील या महिलांकडे वास्तव्यासाठी पक्की घरे आहेत. परंतू २०% महिलांकडे अजूनही कुडाच्या झोपडया निवास करण्यासाठी आहेत. महाराष्ट्र शासनाकडून महिलांचे आर्थिक सबलीकरण व्हावे. म्हणून विविध योजना राबविण्यात येतात. परंतू ७५% महिला या योजनांच्या लाभापासून वंचित आहेत. केवळ २५% महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. कदाचित या शासकिय योजनीची जाणीव जागृती या महिलांमध्ये नसल्यामुळे या वाडीतील महिला या योजनांपासून वंचित आहेत.

**निष्कर्ष :**

- ठाकर समाजातील बहूतेक महिलांचे आर्थिक सबलीकरण उदरनिर्वाहाचे साधन उपलब्धता, मोफत आरोग्य व्यवस्था, स्वयंसेवी संस्थांची आर्थिक मदत यामुळे झाल्याचे आढळून आले.
- खौसाची वाडी येथे कोणताही लघू उदयोग उपलब्ध नसल्यामुळे महिलांचे सबलीकरण करण्यात मर्यादा येत असल्याचे दिसून आले.
- पुरेसे आर्थिक सबलीकरण होण्यामागे या समाजासाठी शासनाच्या विविध योजनांची जाणीव जागृती नसल्याचे आढळून आले.

संदर्भ सूची :

देसाई संभाजी (२०१४) महिला सबलीकरण, प्रशांत पब्लिकेशन

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

उघडे एस. एस. (२०२१) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आणि आदिवासी विकास पूणे पुस्तक मार्केट. कॉम

गोरे गोविंद (२०१३), आदिवासी समस्या व बदलते संदर्भ, पूणे सुगावा प्रकाशन

www.maharibe.com

www.tribal. Maharashtra.gov.in

***Cite This Article:***

**** सौ. पाटील र. आणि प्रा. डॉ.. भामरे ज्ञ. (2023).*** *ठाकर समाजातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास,* **Educreator Research Journal, Volume–X, Issue– II**, *March –April 2023, 72-74.*